**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक-08.06.2026** **वार- सोमवार**

---

## <u>राज्यसभा</u>

राज्यसभेच्या महाराष्ट्रातल्या रिक्त झालेल्या एका जागेसाठीच्या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेंद्र जैन यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी खासदार प्रफुल पटेल, पार्थ पवार, सुनील तटकरे, छगन भुजबळ उपस्थित होते. तसचं भाजपा नेते आशीष शेलार आणि शिवसेना नेते भरत गोगावले हे देखील उपस्थित होते. उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस होता. उद्या अर्जाची छाननी होईल. दरम्यान, पोटनिवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून उमेदवार दिला गेला नसल्यानं जैन यांचा विजय निश्चित मानला जात आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानं ही जागा रिक्त झाली होती.

राजेंद्र जैन हे विधानपरिषदेचे माजी सदस्य आहेत, ते प्रफुल्ल पटेल यांचे निकटवर्तीय मानले जातात.

## <u>पाणी पुरवठा</u>

पुण्यात पुढील आठवड्यापासून पाणी कपात करण्याचा निर्णय महापालिकेनं घेतला आहे. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या प्रमुख धरणातील पाणीसाठयात घट झाल्याने पुण्यात पुढच्या आठवड्यापासून एक दिवसाआड पाणी पुरवठा केला जाईल अशी माहिती महापौर मंजुषा नागपुरे

आणि महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. पुण्याच्या पाणीपुरवठयासंदर्भात एक महत्त्वपूर्ण बैठक आज झाली; त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला.

**<u>नीट-मुंबई</u>**

येत्या 21 जून रोजी होणाऱ्या नीट-यूजी 2026 च्या फेरपरीक्षेसाठी केंद्रांची यादी जाहीर झाली आहे. ही परीक्षा देशातल्या 551 केंद्रांवर दुपारी 2 ते सव्वा पाच या वेळात लेखी पद्धतीनं होणार असून परदेशातल्या 14 शहरांमध्येही होणार आहे. प्रवेशपत्र आणि इतर माहितीसाठी विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळाशी संपर्कात राहण्याचं आवाहन एनटीएनं केलं आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची नीट-यूजी परीक्षा यंदा 3 मे रोजी घेण्यात आली होती, मात्र पेपर फुटल्यामुळे एनटीएनं ही परीक्षा रद्द केली होती. सीबीआय सध्या या प्रकरणाची चौकशी करत आहे. दरम्यान, येत्या 21 जूनला होणाऱ्या या फेरपरीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याचा दावा एनटीएनं, फेटाळला आहे.

**<u>सीबीएसई</u>**

सीबीएसईद्वारे बारावीच्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासण्यासाठी लागू करण्यात आलेल्या ऑनस्क्रीन गुणांकन पद्धतीला आव्हान देणाऱ्या एनएसयूआय या विद्यार्थी संघटनेने दाखल केलेल्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि सीबीएसई ला नोटीस जारी केली आहे. याप्रकरणी पुढील सुनावणी 12 जूनला होणार आहे. ऑनस्क्रीन गुणांकन पद्धतीची निष्पक्षता, पारदर्शकता आणि विश्वसनीयतेवर या याचिकेत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलं आहे.

**<u>रेडिओ 90</u>**

ऑल इंडिया रेडियोला आज नव्वद वर्ष पूर्ण होत आहेत. आजच्याच दिवशी, 8 जून 1936 रोजी इंडियन स्टेट ब्रॉडकास्टिंग सर्व्हिसचं नाव बदलून ऑल इंडिया रेडिओ ठेवण्यात आलं. स्वातंत्र्यानंतर ऑल इंडिया रेडिओचा वेगाने विस्तार झाला आणि 1956-57 मध्ये आकाशवाणी हे नाव या संस्थेला मिळालं. आज आकाशवाणीची 591 केंद्र देशभरात कार्यरत आहेत. देशाच्या 98 टक्के लोकसंख्येपर्यंत विस्तारलेली रेडिओ सेवा 23 भाषा आणि 146 बोलीभाषांमधून प्रसारित होते. तसंच आकाशवाणीचा बाह्य सेवा विभाग 100 पेक्षा जास्त देशांमध्ये प्रसारित होतो आणि परदेशातल्या भारतीयांशी संवाद साधतो. बहुजन हिताय, बहुजन सुखाय या आपल्या ध्येयवाक्याला अनुसरून आकाशवाणी वृत्तसेवा विभाग काम करत आहे. रेडिओ वार्तांकन क्षेत्रात व्यावसायिक नीतिमत्ता आणि मानकांचं पालन करून नागरिकापर्यंत सर्व प्रमुख भाषा आणि बोलीभाषांमधून बातम्यांचं प्रसारण करण्यासाठी आकाशवाणी सदैव प्रयत्नशील आहे.

**<u>Pcmc</u>**

राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळातर्फे पिंपरी चिंचवड शहरातील कचरा वेचकांसाठी कौशल्य विकास आणि सुरक्षा प्रशिक्षण सुरू आहे. आतापर्यंत 500 हून अधिक कचरा वेचकांना प्रशिक्षण देण्यात आलं आहे. यामध्ये आरोग्य सुरक्षा, प्रथमोपचार, आर्थिक साक्षरता, महिला सुरक्षा, व्यसनमुक्ती तसंच विविध शासकीय योजनांची माहिती दिली जात आहे. लाभार्थ्यांना ई-श्रम कार्ड, आयुष्मान भारत योजना, स्वयंसहाय्यता गटांची स्थापना आणि आधुनिक कचरा संकलन वाहनांसाठी उपलब्ध अनुदान योजनांबाबतही मार्गदर्शन करण्यात येत आहे.

**<u>सुशोभीकरण</u>**

पुण्याच्या मध्य भागातील चौकातल्या दिवंगत पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या पुतळ्याचं सुशोभीकरण, शासकीय नियमावली नुसार होत नसून, खासगी विकासकांच्या पसंतीनुसार केलं जात असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि कॉंग्रेसने केला आहे. या संदर्भात महापालिका प्रशासनासमवेत नुकतीच बैठक झाली; यावेळी पुतळ्याचं सुशोभीकरण शासकीय नियमावली नुसार व्हावं अशी मागणी माजी नगरसेवक गोपाळ तिवारी यांनी केली.

**<u>पुणे हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल 37 पूर्णांक 7 आणि किमान 25 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या दुपारनंतर विजांसह हलका पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी सहा वाजता विविध भारती पुणे केंद्रावर ताज्या पुणे वृत्तांतमध्ये नमस्कार.**